"ताजबाग जिल्हा नागपूर विकास आराखडा"
सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता
निधी वितरणाबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग

शासन निर्णय क्रमांक : ताविआ-२०१९/प्र.क्र.१६/का.१४४३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०५ ऑगस्ट, २०१९

वाचा :

नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक : ताविआ २०१३/ प्र.क्र. १६ /का.१४४३, दिनांक ३० सप्टेंबर, २०१३.

प्रस्तावना :-

नागपूर शहरातील हजरतबाबा ताजुद्दिन यांचा ताजबाग येथील दर्ग्याच्या परिसराचा विकास करण्यासाठी नियोजन विभाग शासन निर्णय दि. ३० सप्टेंबर, २०१३ अन्वये रु.१३२.४९ कोटी इतक्या किंमतीच्या **"ताजबाग जिल्हा नागपूर विकास आराखड्यास"** प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या आराखड्याकरीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित करण्यात आलेला निधी विभागीय आयुक्त, नागपूर यांना उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

"ताजबाग जिल्हा नागपूर विकास आराखड्या"तील कामांसाठी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी दि.३१ जुलै, २०१९ च्या पत्रान्वये मागणी केल्यानुसार वित्त विभाग शासन परिपत्रकानुसार ६० % च्या मर्यादेत रु.३०.०० कोटी (रुपये तीस कोटी फक्त) निधी खालीलप्रमाणे उद्दिष्टनिहाय वितरीत करण्यात येत आहे.

(रुपये कोटीत)

मुख्य लेखाशीर्ष	उद्दिष्ट	अर्थसंकल्पीत निधी	६० % च्या मर्यादेत वितरीत करावयाचा निधी
५४५२००७१	५३, मोठी बांधकामे	५०.१०	३०.००

२. ताजबाग जिल्हा नागपूर विकास आराखडयावर होणारा सदरहू खर्च लेखाशीर्ष " मागणी क्र. ओ-१०, मुख्य लेखाशीर्ष भांडवली खर्च, (०१) पर्यटनासाठी पायाभूत सुविधा, १०१, पर्यटन केंद्रे (००)(००)(०२) ताजबाग विकास योजना, जिल्हा नागपूर (५४५२ ००७१) योजनांतर्गत" ५३ मोठी बांधकामे याखाली खर्ची टाकण्यात यावा. या लेखाशीर्षातर्गंत झालेल्या प्रत्यक्ष खर्च व प्रधान महालेखापाल, नागपूर यांचे कार्यालयाने नोंदविलेल्या खर्चाचा दरमहा ताळमेळ घालण्यात यावा. तसेच वितरीत केलेल्या निधीचे "उपयोगिता प्रमाणपत्र" विभागीय आयुक्त, नागपूर यांनी शासनास तात्काळ सादर करावे.

३. वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं २०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.८ जुलै, २०१९ मधील तरतूदीनुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर हा शासन निर्णय उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८०५१५३५४८६५१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Maya Roop Vasudeo

Digitally signed by Maya Roop Vasudeo
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6feaef8191e4a5cf83f3409f76214c1bbb386df214f40eb3db528e6ea18a3bb1, serialNumber=60b30444f3b7ad81b2f32912506b69de2a01b84759943289c5b29755e4712c40, cn=Maya Roop Vasudeo
Date: 2019.08.05 15:46:15 +05'30'

(माया वासुदेव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत : तातडीच्या कार्यवाहीसाठी,

१) विभागीय आयुक्त,नागपूर विभाग,नागपूर,
२) जिल्हाधिकारी, नागपूर,

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (वित्त व नियोजन, वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. पालकमंत्री, नागपूर जिल्हा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.विरोधी पक्षनेता विधानपरिषद / विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री, वित्त व नियोजन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य
८. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा),महाराष्ट्र-१,मुंबई.
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा),महाराष्ट्र-२, नागपूर.
११. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
१२. जिल्हाधिकारी, नागपूर.
१३. सभापती, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, प्रकल्प विभाग, दुसरा माळा,नागपूर सुधार प्रन्यास संकुल ,वेस्ट हायकोर्ट रोड, गोकुलपेठ, नागपूर ४४००१०.
१४. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर.
१५. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर.
१६. वित्त विभाग (व्यय-८) / (व्यय-१६), मंत्रालय, मुंबई.
१७. जिल्हा नियोजन अधिकारी, नागपूर.
१८. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१९.नियोजन विभाग, का.१४२४, मंत्रालय, मुंबई
२०. निवड नस्ती, का.१४४३,नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.